# चित्पावन कुलसंमेलन.... काल, आज आणि उद्या



श्री. राजन पटवर्धन
कार्यवाह, अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी

२००७ साली पुणे येथे झालेल्या चित्पावन कुल संमेलनाला जाण्याचा योग काही पूर्वनियोजित धार्मिक कार्यामुळे आला नव्हता. परंतु संमेलनाला प्रत्यक्ष उपस्थित असलेल्यांकडून जेव्हा वृतान्त समजला, तेव्हा आपल्या अनुपस्थितीची खंत व कमनशिबी–पणाची जाणीव आजही मनात कायम घर करुन आहे. पहिल्या संमेलनाचे नीटनेटके नियोजन, उपस्थितांचा उत्साह, शिस्त, काटेकोरपणा यामुळे लोकांच्या मनात त्याच्या स्मृती कायम आहेत.

डिसेंबर २०११ मध्ये पुण्यात दुसऱ्या चित्पावन कुल संमेलनाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे समजले, तेव्हा आत्तापासूनच तो दिवस कधी येतो याची हुरहूर लागून आहे व सदरहू संमेलनाला प्रत्यक्ष उपस्थित राहून संमेलनाची भव्यदिव्यता 'याची देही याची डोळा' अनुभवण्यासाठी आतुरताही लागून राहिली आहे.

आजपर्यंत केवळ प्रत्येक आडनाव किंवा गोत्रानुसार कुलसंमेलने आयोजित केली जात होती. परंतु २००७ मध्ये आयोजित केलेल्या पहिल्या चित्पावन कुल संमेलनामध्ये एकाच छताखाली किंवा व्यासपीठावर ती आयोजित करण्याचा प्रयत्न केला गेला. त्या प्रयोगाला अभूतपूर्व यश मिळाल्यामुळे यंदा त्याचे स्वरुप अधिक व्यापक व मोठ्या प्रमाणात असल्यामुळे चित्पावनांमधील जागृतीसाठी याचा उपयोग होईल. त्याचप्रमाणे आपण चित्पावन ब्राह्मण समाजाचा एक घटक असल्याचा सार्थ अभिमान जागृत करण्यासाठी व तो अधिक दृढ करण्यासाठी अशा संमेलनांची गरज आहे.

२००७ साली आयोजित केलेल्या पहिल्या कुलसंमेलनामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात आले होते, परंतु २०११ मध्ये त्याचे स्वरुप बदलून विविध उद्योगांद्वारे उत्पादित होत असलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री व्यवस्थापन आयोजित केल्यामुळे चित्पावन ज्ञातीतील इतर उदयोन्मुख उद्योजकांना व भविष्यामध्ये उद्योग सुरु करण्याच्या विचारात असणाऱ्या बांधवांना त्यातून स्फूर्ती घेऊन त्यांच्या उपजत गुणांना वाव मिळवून देण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. चित्पावनांमध्ये दातृत्व हा गुण उपजतच आहे. त्याच्या जोडीला सचोटी, व्यवस्थापन कौशल्य व कष्ट करण्याची तयारी या निसर्गदत्त देणग्यांच्या जोरावर भविष्यामध्ये देशाचे नेतृत्व करण्याची किंवा संपूर्ण देशाचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी आपल्या समाजावर येईल यात कोणतीही शंका नाही व तो दिवस दूर नाही याची पूर्ण खात्री आहे. त्यामुळे यापुढील तिसरे, पाचवे किंवा सातवे कुलसंमेलन पुण्यामध्ये न होता देशाच्या राजधानीत–दिल्लीत – होईल याबाबत शंका नाही.

भारतीय हवाई दलाचे उपप्रमुख पद भूषविलेले व्हाईस एअर मार्शल भूषण गोखले पुणे येथे झालेल्या पहिल्या चित्पावन संमेलनास जातीनिशी गणवेशात उपस्थित राहिले होते. भारतीय हवाई दलातील सुखोई – ३० या अत्याधुनिक लढाऊ विमानासह सर्व प्रकारच्या लढाऊ विमानांचे सारथ्य करुन त्यांनी पेशव्यांचे पराक्रमी सेनापती बापू गोखले यांची परंपरा कायम राखली आहे. रत्नागिरी चित्पावन संघामध्ये कुलसम्मेलनाच्या नोंदणी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र चित्पावन संघाने आयोजित केलेल्या दुसऱ्या चित्पावन कुलसम्मेलनाची आपल्या कुलप्रतिनिधीकडे प्रत्येकी रू. २५० प्रमाणे वर्गणी भरून सम्मेलनातील आपला सहभाग निश्चित करावा.**

**श्री. बाळ करंदीकर** (संगीतकार – गायक)
महाराष्ट्र राज्य शासनाचा १९८९ साली नामवंत गायक म्हणून विशेष पुरस्कार
थोर संगीतकार व गायक **श्री. सुधीर फडके (बाबूजी)**,
**दशरथ पुजारी** यांचे मार्गदर्शन
गीत रामायण, गीत शिवायन, गीत दत्तात्रय, गोंदवल्याचे महाराज ते, भावगीते, भक्तिगीते, अभंग, नाट्यसंगीत, देशभक्तीपर गीते, हिंदी भजने इत्यादी
**संपर्क – फोन : ०२५१–२४२१८६१**

# दुसरे जागतिक चित्पावन कुलसम्मेलन

(पान नं. १ वरून)

प्रतिनिधींचा आकडा किमान १५ डिसेंबरपर्यंत नोंदणी वर्गणीसह संघाकडे द्यावा. प्रतिनिधींची नावे एकवेळ थोडी उशीरा वा आयत्यावेळीही दिली तरी चालतील पण नक्की आकडा पैशांसह आगाऊ देऊन आयोजनासाठी सहकार्य करावे असे नम्र आवाहन मी सर्व ज्ञातिबांधवांना करीत आहे. आपण सर्व त्यासाठी हात पुढे करणार ही खात्री आहे.

तिसरे आवाहन थोडेसे वेगळ्या संदर्भात – पण आपल्या चित्पावन संघासाठी दीर्घकालीन स्थिरतेच्या दृष्टीने – करीत आहे. जागतिक कीर्तीचे शास्त्रीय गायक पंडित संजीव अभ्यंकर, सतीश साने व अन्य मान्यवरांनी ही कल्पना नुसती पुढे मांडली नाही तर त्यासाठी सक्रीय सहाय्य पण लगेच दिले. महाराष्ट्र चित्पावन संघासाठी एक कायम निधी असावा व तो किमान रु. पाच कोटी असावा ही कल्पना कार्यकारिणीने स्वीकारली आहे. रक्कम प्रथमदर्शनी खूप मोठी वाटत असली तरी 'थेंबे थेंबे तळे साचे' प्रमाणे हजारो ज्ञातिबांधवांनी ठरवले तर मुळीच अवघड वा अशक्य नाही. आपल्या स्वत:च्या वाढदिवसानिमित्त आयुष्यात फक्त एकदा तरी रु. एक हजार एकची देणगी संघास देण्याचा संकल्प केला तरी ही रक्कम वर्ष–दीडवर्षातच जमेल. हा कायम निधी जसाच्या तसा सदैव ठेवण्यात येईल व त्याच्या व्याजामधून ज्ञातिबांधवांसाठी अनेक महत्त्वाचे उपक्रम करता येतील. तर हे आवाहन मी याप्रसंगी प्रत्येकाला करीत आहे.

आता शेवटी एका आश्वासनाविषयी. यावेळच्या कुलसंमेलनांसाठी प्रतिनिधी शुल्क म्हणून गेल्या वेळेप्रमाणेच प्रत्येकी रु. दोनशे पन्नास महाराष्ट्र चित्पावन संघाकडे जमा होणार आहे. एक बँकर म्हणून मी सर्वांना असे आश्वासन देऊ इच्छितो की या निधीचा जमाखर्च अत्यंत काटेकोरपणे केला जाईल व जमाखर्चाचे लेखापरीक्षण (ऑडिट) लवकरात लवकर करवून घेतले जाईल. याकडे मी जातीने लक्ष देणार आहे. कोणालाही त्यासंबंधात बोट दाखवता येणार नाही असा माझा प्रयत्न राहील, मात्र ज्यांनी ज्यांनी पावतीपुस्तके नेली आहेत, ती हिशेबासह व रकमेसह संघाकडे उशीरात उशीरा १५ जानेवारी २०१२ पूर्वी देणे गरजेचे आहे. ते सहकार्य सर्वच्या सर्व कुलप्रमुख करतील अशी खात्री वाटते.

चला, आता भेटूया २१ डिसेंबर २०११ ला – पहिल्या दिवशी


# चित्पावन कुलप्रतिनिधी कार्यालय

**द्वारा. महाराष्ट्र चित्पावन संघ, १२०८, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.**

| | | |
|---|---|---|
| **रविवार** | सकाळी ११ ते १<br>दुपारी १ ते ३<br>दुपारी ३ ते ५<br>सायंकाळी ५ ते ७ | गोखले, रानडे (काश्यप गोत्री जोशी)<br>आगाशे<br>करमरकर, कानिटकर<br>अभ्यंकर, खरे |
| **सोमवार** | सायं. ५ ते ७ | फडके, वझे, दिवेकर |
| **बुधवार** | सायं. ५ ते ७ | काळे, मोडक, खाडिलकर |
| **गुरूवार** | सायं. ५ ते ७ | भिडे, केळकर, सोमण |
| **शुक्रवार** | सायं. ५ ते ७ | साने |
| **शनिवार** | सकाळी ११ ते १ | जोगळेकर, केतकर |
| | दुपारी ३ ते ५ | गद्रे |
| | सायं. ५ ते ७ | बापट, पेंडसे |

**कुलदैवत दर्शन**
४ डी.व्ही.डी. संचामध्ये एकूण ९ कुलस्वामिनी आपल्या मूळभूमी पासून स्थलांतरित झालेल्या चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणांच्या कुलदैवताची माहिती देणारा संग्रह. २७ कुलस्वामी परशुराम मंदिर, सुवर्ण गणेश मंदिर, दिवे आगर यांचा सामावेश आहे.
संपर्क :- अजित नेने, कल्याण. मोबाईल : ९०२१०४७२२७

# कुलसंमेलनांची आवश्यकता



**महेश मोडक**
सचिव, चित्पावन संघ, अकोला

भारत स्वतंत्र होण्यासाठी दीडशे वर्षांचा कालावधी लागला, कारण मुळात राष्ट्र म्हणून एकत्र येण्यात यातला बराचसा काळ गेला असे इतिहासतज्ज्ञ म्हणतात. राष्ट्रभावना स्पष्ट झाल्यावरच ध्येय साध्य होऊ शकले. राष्ट्र किंवा समाज हा व्यक्तींचा मिळून तयार होतो. त्याचा विकास व्हावयाचा असेल तर संघटनेवाचून, एकत्र येण्यावाचून पर्याय नाही. एकत्र येणे ही पहिली तर रचनात्मक कार्य ही विकासाकडे नेणारी पुढची पायरी. चित्पावन ब्राह्मण समाज याला अपवाद नाही. पूर्वापार प्रवादांच्या काळ्या चष्म्यातूनच आजही या ज्ञातीकडे पाहिले जाते, संधी नाकारल्या जात आहेत. तरीही बुद्धी आणि विवेक या द्वयींच्या आधारे ह्या आव्हानाला चित्पावन समाजाने तोंड दिले. चित्पावन समाजाने स्वातंत्र्ययुद्ध असो वा सामाजिक सुधारणा नेहमीच समाजाचे नेतृत्व केले. इतिहासात तशी साक्ष आहे.

मात्र आज चित्पावन समाज केवळ सामाजिक नव्हे तर व्यावसायिक आणि वैयक्तिक स्तरावरही एकटा पडत चालला आहे. त्यामागच्या अनेक कारणांपैकी एक म्हणजे स्वतंत्र बुद्धीने चालण्याचा अट्टहास आणि कोषात राहण्याची किंवा कुटुंबापुरते विश्व मानण्याची वृत्ती . याचे नकारात्मक दूरगामी परिणाम भोगावे लागणार आहेत येत्या पिढ्यांना! तेव्हा वेळीच 'एकमेका सहाय्य करु' या भावनेने एकत्र येणे ही काळाची गरज आहे. जागतिक चित्पावन संमेलनाने याची नांदी केली आहे. आता हा ध्वज पुढे घेऊन जायचे आहे. त्यासाठी चित्पावन समाजाचे एकत्रीकरण परिणामकारक व्हावे म्हणून ज्येष्ठ नागरिक, व्यावसायिक, नोकरदार, स्त्रिया, तरुण असे आयाम वापरण्यात येत आहेत, त्यापैकी एक म्हणजे आडनावानुसार कुलसंमेलने.... यातून कौटुंबिक संबंधांमधे अधिक आत्मीयता निर्माण व्हावी, विखुरलेले ज्ञाती-आडनावबंधू एका सूत्रात बांधले जावे, रक्तगटापासून ते विशेष शैक्षणिक पात्रतेपर्यंत अनेक महत्त्वाच्या गोष्टींची सूची तयार व्हावी, त्याचा परस्परांना लाभ व्हावा आणि मुख्यत: व्यक्ती-व्यक्तींवर संस्कार व्हावा हा उद्देश सफल होणार आहे.

इतकेच नव्हे, समाजातील काही सुखवस्तूंना वंचितांना मदत करण्याची, समाजासाठी काहीतरी करण्याची मनापासून इच्छा असते पण ते एकमेकांबाबत अनभिज्ञ असतात. त्यांचा परिचय या निमित्ताने होणार आहे. शिक्षण, प्रबोधन, आर्थिक आधार अशा मार्गांनी वंचितांच्या क्षमता वाढविणे शक्य आहे. (उदा. लिमये कुलातील एका कन्येचे कुलाच्या आर्थिक मदतीमुळे डॉक्टर होण्याचे स्वप्न नुकतेच पूर्ण झाले आहे - संदर्भ : प्राजक्त) काही नोकरी-व्यवसायाच्या संधी, सुयोग्य वधू-वर सुचविणे, एकत्र येऊन उद्योग, परदेशात परगावात मुले राहातात अशा पालकांना कुटुंबासारखा आधार, सहली, ज्ञातीतील गुणवंतांच्या ज्ञानाचा इतरांना लाभ, ज्येष्ठांचे मार्गदर्शन, सुप्त कलागुणांना वाव मिळणे असे बरेच काही यातून घडले आहे आणि अधिक जोमाने घडेल.

क्षमता निर्माण करणे, वाढविणे आणि तिचा उपयोग करता येईल अशी स्थिती समाजाच्या सर्व स्तरावर उपलब्ध असणे यालाच मानव विकास असे म्हणतात. हेच अशा संमेलनाचे उद्दिष्ट आहे. परंतु चित्पावन समाज आपल्या ज्ञातीपुरताच विचार करण्याइतका संकुचित नाही. त्यामुळे कुलसंमेलनाची पुढची पायरी म्हणजे संघटनेचे मजबूतीकरण आणि ज्ञातीचा सर्वांगिण विकास.... त्यातून नेतृत्व निर्माण करून राष्ट्राचा सर्वांगीण विकास आणि अंतिमत: विश्वकल्याण ! परमार्थभक्तीत सातत्य राहाण्यासाठी समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

'आपण अवचित मरोन जावे । मग भजन कोठे करावे
या कारणाने भजनास लावावे । बहुत लोक ।।१२.१०.३२।।

याच तत्वावर ज्ञातीच्या उन्नतीकरता ज्येष्ठांनी तरुणांना सामावून घेऊन तर कुलसंमेलनातून आडनावबंधूच्या कुटुंबांना सामावून घेऊन समाजसेवेचा वारसा द्यायचा आहे. महाराष्ट्र चित्पावन संघाच्या मोठ्या प्रवाहाला समक्षपणे जाऊन मिळण्यासाठी या कुलनद्यांचे पात्र विस्तारायला हवे. ज्ञातिबांधवांच्या प्रचंड उपस्थितीने आणि सकारात्मक जोशपूर्ण प्रतिसादाने हे सहज शक्य होऊ शकेल. त्यामुळे कुलसंमेलनात सहभागी होणे हे प्रत्येक चित्पावनाचे नैतिक आणि सामाजिक कर्तव्य आहे. ज्ञातीसूर्य तळपण्याआधीची ही पहाट आहे.

# चित्पावन तितुका मेळवावा



**मुकुंद परांजपे**
चित्पावन संघ, इंदौर

डिसेंबर २००६ मधे पुण्याला परांजपे कुल संम्मेलनात प्रथमच श्री. अशोकराव वझे ह्यांच्याकडून पहिल्या ''जागतिक चित्पावन संम्मेलन'' बघत ऐकले आणि क्षणभर मनात असे आले की हा माणूस वेडा तर नाही ना ? कारण एक लक्ष चित्पावनांना एकत्र आणण्याचे स्वप्न हा पहात आहे, असा प्रश्न मनात आला. पण त्यांचे संपूर्ण भाषण ऐकताना जेव्हा त्यांचे 'एकमेका साह्य करु अवघे बनू समर्थ' असे बोधवाक्य कानावर पडले. तेव्हा माझ्यातला निर्जीव चित्पावन जागृत झाला व सर्वांना एकत्र आणण्याची ह्या वेड्याची तळमळ व जिद्द जाणवली. त्यानंतर जसजसा अशोकजींशी माझा संपर्क वाढत गेला तसतसे मीही इंदुरात चित्पावन संघ स्थापन करुन २५-३० तरुण मंडळींना एकत्र आणले त्यात आमच्या खासदार श्रीमती सुमित्राताई महाजन ह्यांच्या भरघोस पाठिंब्यानंतर ज्यावेळी अशोकजी आपल्या टीमबरोबर इन्दुरात आले होते. त्यावेळी त्यांच्या सभेला खासदार, महापौर, नगरसेवक-सेविका ह्यांच्या सभेत १००० चित्पावन बांधवांचा मेळावा भरला होता.

त्याचाच प्रतिसाद म्हणून पहिल्या २००७ च्या संम्मेलनात इन्दुरातून ११८० बांधव त्या संम्मेलनात उपस्थित होते. सुमित्राताईंनी ४ दिवस रोज इन्दूर-पुणे गाडीत स्पेशल कोच लावण्याची व्यवस्थासुद्धा करुन दिली होती.

२३ डिसेंबर २००७ रोजी आगाशे कॉलेजात एक लाखापेक्षा जास्त शिस्तबद्ध बांधवांचा मेळावा पाहून प्रत्येकाच्या डोळ्यात आनंदाश्रू आल्याशिवाय राहिले नव्हते. त्या संम्मेलनातली व्यवस्था, वर्कशॉप व इतर कार्यक्रम पाहून सर्व लोक थक्कच होऊन गेले होते. भगवान परशुरामांच्या पादुकांचे दर्शन घडल्यावर प्रत्येकाच्या मुखातून ''गर्व से कहो हम चित्पावन है'' हेच वाक्य निघाले होते. त्या सफल आयोजनाची सर्वत्र तारीफच झाली पण आपल्यातीलच काही विघ्नसंतोषी बांधवांनी अत्यंत गैर प्रचार करुन त्यात विघ्न घालण्याचे खूप प्रयत्न केले होते !

पण त्या झालेल्या प्रकाराकडे कोणीच लक्ष न देता पुन्हा सर्वांनी एकत्र राहावे. ह्याचसाठी पुन्हा २०११ मधे त्याच जागी दुसरे सम्मेलन करण्याचे योजिले आहे, त्यात २१ ते २५ डिसेंबर पर्यंत व्यावसायिकांचा मेळावा पण भरवला जाणार आहे. तो यशस्वी होण्यासाठी सर्व ज्ञातिबांधव भगवान परशुरामाचा आशीर्वाद घेऊन नव्या जोमात तयारीला लागले आहेत. ते फक्त एक प्रदर्शन नसून त्यातून आपण आपल्याच माणसांना कशी मदत आपणच करु शकू ह्याचा विचार प्रामुख्याने करावयास पाहिजे. त्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन आपापले कुल संम्मेलनातही सहभागी व्हावे अशी ''मध्यप्रदेश चित्पावन संघ, इन्दूर''च्या वतीने कळकळीची व करबद्ध विनंती करीत आहोत.

आम्ही तर आपल्या स्वागतासाठी तेथे हजर राहूच यात शंका नसावी. तेव्हाच ''एकमेंका साह्य करु अवघे बनू समर्थ'' हे ब्रीदवाक्य खऱ्या अर्थाने सर्व चित्पावन बांधवांना कळेल असे आम्ही समजतो.

सम्मेलनाच्या यशस्वीतेकरता इन्दूर-भोपाळच्या वतीने अंदाजे १०० चित्पावन बांधवांनी १० डिसेंबर २०११ रोजी जानापावा (श्री भगवान परशुरामाचे जन्मस्थान इन्दूरपासून ४० किमी. अंतरावर) येथे परशुरामाच्या चरणी प्रार्थना केली आहे कारण कार्य सिद्धीस नेण्यास ते समर्थ आहेतच !

## अभिनंदन



श्री धनंजय ओक

नुकत्याच झालेल्या पुणे सार्वजनिक सभेच्या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये महाराष्ट्र चित्पावन संघाचे माजी कोषाध्यक्ष श्री धनंजय ओक यांची बिनविरोध निवड झाली.

## बापट कुलसम्मेलन

रविवार दि. २५ डिसेंबर २०११ रोजी समस्त बापट परिवाराचे कुलसम्मेलन लोकमान्य सभागृहात संपन्न होणार आहे. यावेळी इ.१०वी व इ.१२वी परीक्षेतील ९० टक्के व अधिक गुणधारक विद्यार्थ्यांचा व इतर क्षेत्रातील नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या बापट बंधु-भगिनींचा सन्मान केला जाणार आहे. तरी सर्व सबंधितांनी खालील व्यक्तींशी त्वरित संपर्क साधावा .

विद्याताई ९४२२३०५६७५
श्यामलाताई ९९७००९६०१०

# आवाहन

महाराष्ट्र चित्पावन संघातर्फे गेली ७५ वर्षे आर्थिक दृष्ट्या गरजू चित्पावन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्याचप्रमाणे उच्च शिक्षणासाठीही गरजू विद्यार्थ्यांना बिनव्याजी शिष्यवृत्ती दिली जाते. याचा फायदा शेकडो विद्यार्थ्यांना झाला आहे. आपण देखील या उपक्रमास भरघोस आर्थिक मदत करून आपल्या तरुणांना उच्च शिक्षणासाठी सहाय्य करु या. ज्यांना शिक्षणासाठी देणगी स्वरुपात आपल्या तरुण पिढीला आर्थिक मदत करावयाची असेल त्यांनी "**महाराष्ट्र चित्पावन संघ पुणे**" या नावाने धनादेश काढावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क : जयंत नातू - ९८२२०४४४७६, केतन जोगळेकर - ९०११०१०३९०**

# कुलसंमेलनांची गरज आहे



**सुहास सोहनी**

अध्यक्ष,चित्पावन संघ, अमरावती

एकदा एका चित्पावन गृहस्थाला सहज विचारले की आपल्याच आडनावाचे प्रतिष्ठित व्यावसायिक कुटुंब आपल्या शहरात राहतात ते आपले कोण आहेत ? तेव्हा लगेच उत्तर मिळाले की 'नाही, नाही ते आमचे कुणी नातेवाईक नाहीत. ते केवळ आमचे आडनावबंधू आहेत. वास्तविक दोघांचे मूळ गाव, मूळ पुरुष, कुलदेवता, कुलदैवत एकच असताना ओळख सांगताना एवढा कोरडेपणा का आला असावा ? एखाद्या कुलाचे सदस्य आपले मूळ गाव सोडून विविध कारणांनी वर्षानुवर्षेदेश-विदेशातील अनेक शहरात वास्तव्य करून आहेत. कुलविस्तारामुळे सदस्यसंख्या कितीतरी पटीने वाढली आहे. कुणाची कुणाशी भेट सुद्धा होत नाही तरी पण कुल आणि गोत्राच्या धाग्यांनी ते सर्व एकमेकांशी बांधलेले आहेत, फक्त ही गोष्ट मान्य करण्याची गरज आहे. म्हणूनच विविध ठिकाणी जमतील तशी प्रत्येक कुलाची संमेलने संपन्न होण्याची गरज आहे. आपल्या कुलातील कितीजण उद्योग, व्यावसायिक क्षेत्रात आहेत, कलेच्या प्रांतात कोण आहेत, खेळाडू कोण आहेत, समाजासाठी कोणी काय योगदान दिले आहे. ही सर्व माहिती नक्कीच रंजक असणार. अपरिचित असलेले कुलसदस्य, वारंवार भेटी होत असल्या तर अगदी जवळचे वाटतील. ही नक्कीच फार मोठी उपलब्धी आहे. लग्नसंबंधामुळे इतर कुलांशी आपले नातेसंबंध जुळतात, जवळीक निर्माण होते परंतु आपल्या कुलाच्या सर्व सदस्यांचे आपले नाते असतेच ते जाणून घेऊन आपलेपणा निर्माण होण्याची गरज आहे. आपलेपणा, जवळीक, ओलावा, गरजवंतांसाठी काहीतरी करण्याची वृत्ती, हे विचार असे गुण सुदृढ समाजाच्या आरोग्य संवर्धनासाठी अमूल्य आहेत. विविध कुलसंमेलनांद्वारे ही फलप्राप्ती व्हावी ही मन:पूर्वक इच्छा.

# एकमेकांस साह्य करू



**नरेंद्र जोग**

चित्पावन संघ, नागपूर


सध्या सगळीकडेच छोटे कुटुंब व आर्थिक परिस्थिती उत्तम अशी स्थिती दिसते. अशा उत्तम स्थितीतील समाज बांधवांनी, आपला अडचणीत असलेला समाज हेच आपले दुसरे अपत्य आहे अशी भावना जोपासून त्याला मदत करावी.

तरुण पिढीला अशा सम्मेलनांना येण्यास उद्युक्त करावे ज्यामुळे त्यांनाही आपल्या समाजाची नीट ओळख होईल. प्रत्येक चित्पावन संघाने आपल्या शहरात एकही समाजबांधव अडचणीत किंवा दु:खात राहणार नाही याची काळजी घ्यावी. आम्ही नागपूरात अशी व्यवस्था राबवीत आहोत.

समाजात अडचणीतील बांधवांना मदत केल्याने पूर्ण समाज प्रगत, समृद्ध होईल व देशावर आपल्या समाजाचा भार राहाणार नाही ही एक प्रकारे देशसेवाच नाही का ?

नरेंद्र जोग, चित्पावन संघ, नागपूर

# जागतिक चित्पावन सम्मेलनाची आवश्यकता



**विजय साने**

अध्यक्ष, चित्पावन संघ, नाशिक

महाराष्ट्र चित्पावन संघाने २००७ साली पहिले जागतिक चित्पावन संमेलन अभूतपूर्व अशा संख्येने मोठ्या दिमाखात भरवले. हे शक्तिप्रदर्शन होते का ? हो जरुर शक्तिप्रदर्शनच झाले. कारण आतापर्यंत नगण्य समजलेला चित्पावन समाज एवढ्या मोठा संख्येने एकत्र आलेला पाहून राजकीय, सामाजिक, शासकीय व्यक्तिंनी त्याची दखल घेऊन आपल्या मतांचे मूल्य जाणले म्हणून एकत्र येणे आवश्यकच आहे. आपण एकटे नाहीत सर्व एक होऊ या.

संमेलनाचे पुढचे पाऊल आता होणारे जागतिक औद्योगिक प्रदर्शन ह्यामधून रोजगार निर्मितीचे मोठे कार्य आपण हाती घेणार आहोत. उत्पादन व विक्री करु इच्छिणारा तरुण वर्ग आमने-सामने चर्चा करुन मार्ग काढतील. आरोग्यासंबंधी मार्गदर्शन, मदत हे कामही व्यापक प्रमाणात चित्पावन संघाने हाती घ्यावे म्हणून सर्वांना विशेषत: ज्येष्ठांना त्याचा मोठा लाभ होईल. यातूनच नाशिक चित्पावन संघाची वृद्धाश्रमांची कल्पना लवकरच अंमलात येणार आहे.

अनेक ज्येष्ठ एकाकी राहतात, त्यांची मुले परदेशात राहतात. अशा वृद्धांना आपल्यातील गरजू मुलांकडे त्यांचे पालकत्व देखभाल एवढ्यापुरते मिळवून द्यावे अशी नाशिक चित्पावन संघाची कल्पना असून त्यासंबंधी इतर शहरातील संघांशी बोलणी चालू आहेत. जेणेकरुन ह्या वृद्धांना नातू व मुलांना आजी-आजोबा मिळतील. चित्पावनही गरीब आहेत. अगदी दारिद्र्यरेषेखाली सर्व चित्पावन संघानी अशांचा शोध घेऊन त्यांना मदत करा. शिक्षणासाठी, रोजगारासाठी आपणच पुढे आले पाहिजे. आमच्या संघाने हा उपक्रम चालू केला आहे हे व असे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी चित्पावन संघांनी एकत्र बैठका घेणे आवश्यक आहे. तसा प्रयत्न महाराष्ट्र चित्पावन संघ करत आहे, त्याबद्दल धन्यवाद ! आणि म्हणूनच अशी जागतिक चित्पावन संमेलने भरवणे ही काळाची गरज आहे; त्यामुळे आपले प्रश्न तर आपण सोडवूच पण आपले शक्तिप्रदर्शन घडवून आपला एकोपा व उत्कर्ष जरुर साधू या. ही परशुरामचरणी प्रार्थना. दुसऱ्या जागतिक चित्पावन संमेलनास माझ्यासह सर्व नाशिककर चित्पावनांच्या शुभेच्छा !

**www.maharashtrachitpavan.com ला भेट द्या !**

# सामूहिक मौंजीबंधन सोहळा

महाराष्ट्र चित्पावन संघ, पुणे यांच्या 'महिला मंचा' तर्फे **सामूहिक मौंजीबंधन सोहळा** दि. २६ जानेवारी २०१२ रोजी आयोजित केला आहे. इच्छुकांनी नाव नोंदणीसाठी त्वरित संपर्क साधावा.

फोन : ०२०-२४४७५८३६, २४४७१७४०




Emkay

**GIST INVESTMENT**

BSC, NSC, F&O

25, Matrukrupa, 962, Sadashiv Peth, Pune - 411 030.

RAHUL BHATE 9822082991

NIRANJAN GOLE 9881234106

EMKAY GLOBLE FINANCIAL SERVICES LTD.

नको वीज... नको मेन्टेनन्स कॉन्ट्रॅक्टची कटकट ! हवी १०० % सुरक्षितता !




• प्युअर फ्लो ज्याचे घरी... आरोग्य तेथे वास करी...
• वीजेची गरज नाही. • पाणी उकळण्याची गरज नाही
• कुठल्याही प्रकारची केमिकल्स नाहीत.

**Pureflo** Water Purifiers

**स्वरूप एजन्सीज्**, ११४३, सदाशिव पेठ, पुणे

विक्री, सेवा, विश्वासार्हता यांचा त्रिवेणी संगम !

सतीश साने : ९७६३७१३९०१, ९८२३७५७७९७

कात्रण घेऊन येणाऱ्यास विशेष सवलत